**मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत यंत्रांचे Machine Output Factor निश्चित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल विभाग**

**R&FD-86032/12/2026-FAR - REV-REVENUE /(E- 1846546)**

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२

तारीख: ११ सप्टेंबर, २०२६

**वाचा :-**

१. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १४.१२.२०२५

२. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र.व्हीबी जी रामजी/प्र.क्र./अ.का.१/कावि-२५३/२६, दि.२०.०८.२०२६

**प्रस्तावना : -**

दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" सुरु करणे व ती राबविण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये दिनांक दि. ०७.०१.२०२६ , दि.१८.०२.२०२६, दि.२५.०३.२०२६ , दि.१५.०४.२०२६, दि.२२.०६.२०२६, दि.१५.०७.२०२६, दि.२४.०७.२०२६ , दि.२८.०७.२०२६ रोजी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

दि. १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार १ कि.मी. रस्त्याच्या कामासाठी ७० HP JCB साठी १२५ तास व Chain/Poclain प्रकारच्या यंत्रासाठी ५० तास इतकी कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तथापि, प्रत्यक्ष क्षेत्रीय अंमलबजावणीदरम्यान ६०० मि.मी. माती व ३०० मि.मी. मुरूम ही दबाईनंतरची (Compacted Thickness) जाडी प्राप्त करण्यासाठी अधिक प्रमाणात माती/मुरूम पसरवणे, ड्रेसिंग करणे, लेयर फॉर्मेशन व कॅम्बर तयार करणे इत्यादी अतिरिक्त कामे करावी लागतात. सद्यस्थितीत ऑनलाइन तांत्रिक मान्यता प्रणालीमध्ये (IWMS) गृहीत धरलेला Efficiency Factor (JCB - ५२.५६ घ.मी./तास आणि Poclain - १३१.४० घ.मी./तास) प्रत्यक्ष क्षेत्रावरील उत्पादकतेशी सुसंगत नसल्याने प्रत्यक्ष आवश्यक तासांपेक्षा कमी तास मंजूर होत आहेत. परिणामी कामाची गुणवत्ता व प्रत्यक्ष रस्त्याची लांबी यामध्ये तफावत निर्माण होत असल्याचे जिल्हाधिकारी, नागपूर यांनी निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

या सर्व बाबींचा तांत्रिक व क्षेत्रीय आढावा घेऊन योजनेच्या प्रभावी व गुणवत्तापूर्ण अंमलबजावणीसाठी शासन निर्णयातील यंत्रांचे Machine Output Factor निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय : -**

शासकीय तांत्रिक अहवाल व क्षेत्रीय अडचणींचा विचार करून, "मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजने"अंतर्गत यंत्रांच्या वापराबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे:-

**१. Machine Output Factor ची अंमलबजावणी:-**

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत रस्ते कामासाठी लागणारी यंत्रसामग्री (उदा. Excavator/JCB) एका तासात किती घनमीटर (Cubic Meter) खोदाईचे काम करेल, याचे परिमाण हे प्रामुख्याने संबंधित भूस्तराच्या (Soil/Strata Type - उदा. Hard Murrum, Soft Rock, किंवा Ordinary Soil) प्रकारावर अवलंबून असते.

भौगोलिकदृष्ट्या एकाच प्रकारच्या भूस्तरासाठी मशिनरीची कार्यक्षमता संपूर्ण राज्यात सारखीच राहणे अपेक्षित असले, तरी प्रत्यक्षात स्थानिक पातळीवर भूस्तराची एकसमानता (Uniformity) आढळून येत नाही. यास्तव, भौगोलिक विविधतेचा विचार करून, संबंधित कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (Executive Engineer) यांनी संबधित जिल्ह्यातील भूस्तराची स्थानिक पाहणी करावी. त्यानुसार मशिनरीचे परिमाण' (Machinery Output Factors) निश्चित करून देण्यात यावे.

२. या योजनेंतर्गत करावयाचे रस्ते हे मुरुमीकरणापर्यंत करणे अभिप्रेत असून त्याकरीता रु.१५ लाख प्रती कि.मी. अशी मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. सबब, शेत/पाणंद रत्यांची कामे रु.१५ लाख एवढ्या मर्यादेमध्येच करण्याची दक्षता घेण्यात यावी.

**३. वेबपोर्टलमध्ये आवश्यक बदल (System Changes):**

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी IWMS / ऑनलाइन प्रणालीमध्ये संबंधित कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (Executive Engineer) यांच्याकडून Machinery Output Factor प्राप्त करुन समाविष्ट करून प्रणाली तातडीने अद्ययावत करण्यात यावी. उपरोक्त सूचनांप्रमाणे वेबपोर्टलमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९१११११०५४९३८४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAPSINH
MACCHINDRA KHARAT

Digitally signed by PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=0e963b9a3b438beeb9634a49f8df67395a23cc57553bf278360d37dc7d2fbada, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E85A4EBC6765D49CC36FAB03572D08CB3773059876920F924659873AA200A822, cn=PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
Date: 2026.09.11 11:07:35 +05'30'

**( प्रतापसिंह म. खरात )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
८. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई,
११. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४.सर्व पोलीस अधिक्षक.
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१६. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१७.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
१८.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.
१९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.
२०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२१. सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग
२२.निवडनस्ती (पाणंद रस्ते)